**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १३ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. **अहमदाबाद विमान अपघातानंतर सर्वत्र हळहळ/ अपघात स्थळाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली भेट.**
2. **नागपूरमध्ये उभारणार हेलिकॉप्टर निर्मिती कारखाना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'मॅक्स एरोस्पेस' आणि उद्योग विभागात सामंजस्य करार.**
3. **शहीद शताब्दी आणि गुरुता गद्दी समागमच्या यशस्वी आयोजनासाठी राज्य शासनाचे संपूर्ण सहकार्य, नागपूरात देखील होणार आयोजन- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**
4. **आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त काउन्ट डाऊन योग दिन कार्यक्रमाचे आयोजन.**

**आता सविस्तर बातम्या …….**

विमान अपघात- पंतप्रधान भेट

अहमदाबादमधल्या अपघातस्थळावर गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाला एक डिजिटल व्हिडीओ रेकॉर्डर मिळाला आहे. न्यायवैद्यकीय तज्ञांचं पथकही पोचले आहे. या दुर्घटनेनंतर अनेक स्थानिक रहिवासी बेपत्ता झाले असून त्यांचा शोध सुरू आहे. दुर्घटनेतल्या जखमींचे प्राण वाचवण्याच्या आशेनं अनेक जण रक्तदान करण्यासाठी मोठ्या संख्येनं पुढाकार घेत आहेत. तसंच, अहमदाबाद इथल्या लष्करी छावणीत भारतीय सैन्यानं रक्तदान शिबीर आयोजित केलं आहे. अपघातग्रस्तांच्या कुटुंबांसाठी रस्ते, गृहनिर्माण तसंच वाहतूक विभागाकडून निवास आणि वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी गुजरातमध्ये अहमदाबाद सरकारी रुग्णालयात जाऊ विमान अपघातात जखमी झालेल्यांची भेट घेतली. अपघातातून बचावलेले विमान प्रवासी रमेश विश्वासकुमार यांच्याशी त्यांनी संवाद साधला. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या कुटुंबाची भेट घेऊन त्यांनी शोक व्यक्त केला. त्यानंतर मोदी यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन परिस्थितीचा आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. अहमदाबादमधल्या या दुर्घटनेचा आपल्या सर्वांना धक्का बसला आहे. इतक्या

क्षणार्धात एवढे जीव गमावण्याचं दुःख शब्दात व्यक्त करता येणार नाही. सर्व शोकाकुल कुटुंबांच्या दुःखात आपण सहभागी आहोत, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. अहमदाबाद विमानतळावरून लंडनकडे निघालेलं विमान अवघ्या काही क्षणातच विमानतळाजवळ कोसळल्यानं काल हा अपघात झाला. या अपघातात १२ कर्मचाऱ्यांसह २४१ जणांचा मृत्यू झाला. अपघात स्थळावर आजही मदतकार्य सुरू आहे. दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या मृतदेहांची डीएनएच्या मदतीने ओळख पटवण्याचं काम सुरू असून, ओळख पटलेले मृतदेह शवविच्छेदनानंतर कुटुंबांकडे सुपूर्द केले जात आहेत. आतापर्यंत सहा मृतदेह संबंधित कुटुंबांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. दरम्यान, अहमदाबादच्या सरकारी रुग्णालयात सध्या ३२ जणांवर उपचार सुरू असून गंभीररीत्या होरपळलेले काही रुग्ण वगळता अन्य सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.राकेश जोशी यांनी दिली आहे.

***पूरे आरोग्य विभाग ने और सिविल हॉस्पिटलने सारे डॉक्टर ने मिलकर वो इमरजेंसी सिचुएशन को हैंडल किया। करीबन 60 लोग आये थे उस टाइम पे जिसमें से काफी लोग ओपीडी बेस पे जिनको थोड़ी बहुत इंज्युरी थी उनको डिस्चार्ज कर दिया गया। अभी फिलहाल अगर आज हम देखेंगे तो हमारे पास 32 पेशंट यहाँ पर ऐडमिटेड हॉस्पिटल के अंदर हमारे पास उसमें मेडिकल स्टूडेंट्स भी है आसपास के लोग वाले भी है और अगर उसमें देखा जाये तो लोग जो हेल्प करने आये थे वो भी है जो प्लेन में नहीं सवार थे। ऐसे लोगों को जो इंज्युरी हुई और सिविल हॉस्पिटल सबसे नजदीक और ये सरकार की सबसे बड़ी व्यवस्था है, जिसमें लोगों को इमीडियटली सारवर दी गई।***

या दुर्घटनेबद्दल देशोदेशीच्या नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. दरम्यान, या विमान दुर्घटनेच्या तपासात अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाचं तपास पथक चौकशीसाठी भारतात दाखल होणार आहे, या तपासात भारतीय अधिकाऱ्यांना हे पथक मदत करणार असल्याचं सुरक्षा मंडळानं समाज माध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये राज्यातल्या सात जणांचा समावेश आहे. यातले पाच जण एअर इंडियाचे कर्मचारी होते. अपघात ग्रस्त विमानात नागपुरातील कामदार कुटुंबियांचे ३ नातेवाईक असल्याची माहिती आहे.

अजित पवार

लाडकी बहीण योजना, तसेच आपातग्रस्त आणि राज्य शासनाची विविध विभाग याकरिता स्वतंत्र निधीची राज्य शासनाकडून तरतूद असल्याने कोणताही निधी कोणत्याही विभागाचा वर्ग केलेला नाही ज्या लेखाशीर्षाचा निधी त्याकरिताच वापरला जात आहे त्यामुळे संभ्रम बाळगू नये असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव शहरातील १२ जुन ला संकल्प मेळाव्यानिमित्त आले आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. शेतकऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली

***त्या सगळ्यांना पुन्हा उभं करण्याचं काम हे महायुतीचा सरकारचा  आहे आमचं सगळ्यांचा आहे, आणि तशा पद्धतीची मदत धान्याचं बाबतींमध्ये असेल तातडीची दहा हजार रुपये मदत करण्याच्या बाबतीत काही गोष्ट असेल किंवा त्यांना पुन्हा त्यांची परिस्थिती पूर्वपदावर येण्याच्या करता जे काही सहकार्य करण्याची गरज असेल ते पण निर्णय हा महायुतीचा सरकारने कॅबिनेटमध्ये घेतलेला आहे आणि त्याची अंमलबजावणी सुरू झालेली आहे.***

शेतकरी तसेच आपातग्रस्त आणि लाडकी बहीण योजना यासह विविध योजनांचा निधी कुठेही न वळवता राज्य शासनाच्या शासनाच्या तिजोरी मधून निधीची स्वतंत्र तरतूद केलेली आहे असे ते म्हणाले. यावेळी खामगाव शहरांमध्ये काँग्रेसचे १५ वर्ष आमदार असलेले माजी आमदार दिलीप कुमार सानंदा यांनी आपल्या हजारो समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला.

मतदारयादी

भारतीय निवडणूक कायद्यांनुसार, मतदारांची नावे केंद्रीकृत स्वरूपात समाविष्ट किंवा वगळण्याची कोणतीही तरतूद नसल्याचं राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांबाबत प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध लेखाच्या अनुषंगाने, मतदारयादीत नावांची भर घालणे किंवा वगळणे, याबाबत करण्यात आलेल्या दाव्यांच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांनी हा खुलासा केला. राज्यातल्या मतदार संख्येच्या वाढीबाबत लेखातील माहिती दिशाभूल करणारी असल्याचं त्यांनी सांगितलं. मतदार नोंदणी प्रक्रिया संपूर्ण पारदर्शक असून, यामध्ये सर्व राष्ट्रीय पक्षांशी सातत्यानं समन्वय साधला जात असल्याचं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे.

हेलिकॉप्टर उत्पादन निर्मिती

नागपुरात सुमारे 8 हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा हेलिकॉप्टर उत्पादन निर्मिती कारखाना उभारण्यात येणार आहे. यासंदर्भात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मॅक्स एरोस्पेस अँड एव्हिएशन प्रा. लि. आणि महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागात नागपूरमध्ये हेलिकॉप्टर उत्पादन कारखाना उभारण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. नागपूरमधील संरक्षण उत्पादन क्षेत्राला यामुळे गती मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. सह्याद्री अतिथीगृहात आयोजित कार्यक्रमात उद्योग विभागाचे सचिव पी अन्बलगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आदी उपस्थित होते. श्री. अन्बलगन आणि मॅक्स एरोस्पेसचे अध्यक्ष भरत मलकानी यांच्यात हा सामंजस्य करार झाला. या करारानुसार मॅक्स एरोस्पेस नागपूर येथे हेलिकॉप्टर निर्मिती कारखाना उभारणार असून त्याचे प्रत्यक्ष काम 2026 पासून सुरू होणार आहे. या प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुमारे दोन हजार रोजगार निर्मिती होणार असून या प्रकल्पात आठ वर्षांमध्ये सुमारे 8 हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तंत्रज्ञानाचा समावेश असून, रोटरी-विंग प्लॅटफॉर्म्सचे कस्टमायझेशन, इंटिग्रेशन आणि फ्लाइट टेस्टिंग यासाठी हे उत्कृष्टता केंद्र (सेन्टर ऑफ एक्सलन्स) म्हणून कार्य करणार आहे. नागपूर विमानतळाजवळ हे केंद्र असल्यामुळे विद्यमान पायाभूत सुविधा आणि लॉजिस्टिक सपोर्टचा लाभ घेता येणार आहे. यामुळे भारताच्या वाढत्या एरोस्पेस पुरवठा साखळीतही योगदान मिळणार आहे.

समागम कार्यक्रम

श्री गुरु तेग बहादुर साहेब जी यांचा 350 वा शहिद आणि गुरुगोविंद सिंग जी यांचे ३५० वा गुरु ता गद्दी समागम कार्यक्रमाचे आयोजन राज्यात नांदेड नागपूर व मुंबई या तीन ठिकाणी करण्यात येईल. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राज्य शासन संपूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत या कार्यक्रमांमधून श्री गुरु तेग बहादुर साहेबजी व गुरुगोविंद सिंगजी यांचा इतिहास निश्चितच पुढील पर्यंत पोहोचविता येईल, असा विश्वासही व्यक्त केला. वर्षा निवासस्थानी श्री गुरु तेग बहादुर 350 शहीद समागम व गुरु गोविंद सिंग गुरुता गद्दी समागम कार्यक्रमाच्या आयोजनबाबत राज्यस्तरीय समितीची बैठक पार पडली. बैठकीतून राज्यस्तरीय

समितीच्या समन्वय रामेश्वर नाईक यांनी माहिती दिली. समागमाचे आयोजन नांदेड येथे १५ व १६ नोव्हेंबर, नागपूर येथे ६ डिसेंबर, नवी मुंबई येथे २१ व २२ डिसेंबर २०२५ दरम्यान करण्याचे नियोजन आहे.

'आर्टी'

मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी बार्टीच्या धर्तीवर 'आर्टी' संस्थेचे सक्षमीकरण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. काल मातंग समाजाच्या मागण्यासंदर्भात फडणवीस अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यासाठी अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणासाठी निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असल्याचं त्यांनी सांगितलं. मातंग समाजाच्या सघटनांनी आपल्या मागण्या लेखी स्वरूपात समितीकडे सादर कराव्यात. येणाऱ्या जातनिहाय जनगणनेमध्ये लोकसंख्येच्या आधारे वर्गीकरणात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

प्रकाश आबिटकर

बांधकाम पूर्ण झालेली रुग्णालये कार्यान्वित करून लवकरात लवकर जनतेच्या सेवेत आणावीत, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. काल मुंबईत आरोग्य भवन इथं झालेल्या बैठकीत ते बोलत होते. स्थानिक प्रशासनाने घरोघरी जाऊन आरोग्य तसंच स्वच्छतेबाबत जनजागृती करावी, असे निर्देशही आबिटकर यांनी यावेळी दिले.

प्रतिभा धानोरकर

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील जनआंदोलनाला आपला पूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी माजी आमदार बच्चू कडू यांना पाठवलेल्या पत्राद्वारे हा पाठिंबा व्यक्त केला आहे. तत्पूर्वी कडू यांच्या आंदोलनाला सरकार दुर्लक्षित करत असल्याने आज एका व्यक्तीने विष प्रश्न केल्याचे वृत्त आमच्या प्रतिनिधीने ने दिले.

अर्थसहाय्य

वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतीचे पिक नुकसान, मनुष्यहानी, मनुष्य जखमी, पशुधन हानी अशा घटना घडल्यास वन विभागाच्यावतीने नुकसान म्हणून अर्थसहाय्य देण्यात येते. वर्धा जिल्हयातील आठ वनपरिक्षेत्र व बोर व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणाऱ्या परिक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या गेल्या दोन वर्षात झालेल्या शेतीचे पिक नुकसान, मनुष्यहानी, मनुष्य जखमी, पशुधन हानीसाठी 18 हजार 726 लाभार्थ्यांना 18 कोटी 33 लक्ष 96 हजाराचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

योग दिवस

भारत सरकारच्या सूचना प्रसारण मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय नागपूर, पत्र सूचना कार्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष प्रचार अभियान अंतर्गत जागतिक योग दिनाच्या प्रचार-प्रसार आणि जागृतीच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय योग दिन 8 दिवस शेष, काउंट डाऊन योग दिनाचे आयोजन केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय, नवीन सचिवालय भवन सिव्हील लाईन नागपूर येथे आयोजीत करण्यात आलेले होते. आर्ट ऑफ लिविंग नागपूरच्या योग शिक्षिका संगीता सोनसल, पूर्णकालिक योग शिक्षक पतंजली नागपूरचे मोहन वैरागडे यांनी उपस्थित कर्मचारी आणि नागरिकांना योगाचे महत्व सांगीत योगाचे विविध प्रकाराचे आसन करवून घेत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन, प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन केंद्रीय संचार ब्युरो, क्षेत्रीय कार्यालय नागपूरचे कार्यालय प्रमुख संजय तिवारी यांनी केले. त्याच प्रमाणे वर्धा इथल्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, निसर्ग सेवा समिती, पतंजली योग परिवार यांच्या सहकार्याने 13 जून रोजी ऑक्सिजन पार्क येथे जागतिक योग दिनाच्या प्रचार आणि जनजागृतीसाठी विशेष प्रचार मोहिमे अंतर्गत 'काउंट डाउन योग दिन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी नियमित योग करण्याची गरज आहे असे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संबोधित करतांना निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे म्हणाले. कार्यक्रमात सहभागींनी विविध योग उपक्रम आणि योगासनांचा सराव केला.

हवामान

पुढील आठवड्या च्या सुरुवातीला अर्थात 15 आणि 16 जून रोजी नागपूर भंडारा गोंदिया गडचिरोली या जिल्हयांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा नागपूरच्या

प्रादेशिक हवामान केंद्रांने दिला आहे. तत्पूर्वी, आजही उद्या संपूर्ण विदर्भात विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा आणि वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान आज नागपुरात 39.8 अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आले. हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार मागील वर्षी तुलनेत यंदा पाऊस जास्त प्रमाणात पडण्याचा अंदाज आहे. उद्भवलेल्या परिस्थिती योग्य प्रकारे हाताळणे आणि योग्य प्रकारे नियंत्रण मिळविण्यासाठीचे प्रशिक्षण देण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यात एस.डी.आर.एफ पथक दाखल झाले असून, चंद्रपूर जिल्हा आणि तालुका पातळीवरील सर्व कर्मचाऱ्यांनी हे प्रशिक्षण प्राप्त करावे, पावसाळ्याच्या हंगामात नागरिकांनी नदी नाल्याच्या काठावर जाऊ नये, प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी यांनी केले आहेत.

******